ललिता गंडभीर
4200 N. Ocean Dr.

1501-2

Riviera Beach

FL 33404

U.S.A

# एच्. एम्. ओ. झिंदाबाद

मला बरेच महिने हर्निया झाला होता. मला सर्जरीची भीती वाटत होती म्हणून मी हर्नियाकडे दुर्लक्ष केले होते. पण एक दिवस हर्निया झाला होता तिथे खूप दुखायला लागले म्हणून मी डॉक्टरांकडे गेलो.

डॉक्टर म्हणाले, " ताबडतोब तुझे हर्नियाचे ऑपरेशन करायला हवे. तू तुझ्या एच्.एम्.ओ.ला फोन कर. ह्या ऑपरेशनला त्यांच्या परवानगीची जरूरी आहे. मी पण तुझ्या एच्.एम्.ओ.ला फोन करून सांगतो."

मी लगेच एच्.एम्.ओ.ला फोन केला. फोनवर गोड आवाजात एक बाई म्हणाली, "मी मिस् डिलीडॅली बोलतेय." मी तिला हर्नियाबद्दल व त्याबद्दल माझ्या डॉक्टरांचे मत सांगितले.

ती म्हणाली, "तुला मिस्टर पोस्टपोनला भेटायला हवे. ऑगस्टमधली अपॉइंटमेंट देते."

"ऑगस्टपर्यंत दोन महिने उलटतील. मला तेवढे दिवस थांबणे शक्य नाही. डॉक्टर म्हणालेत की, इमर्जन्सी सर्जरीची जरूर आहे."

"डॉक्टर नेहमी अतिशयोक्ती करतात." तिने फोन ठेवून दिला.

मी डॉक्टरांना फोन केला, ते म्हणाले, "तुझे ऑपरेशन पुढे ढकलून चालणार नाही. हे पहा, एच्.एम्.ओ.ना पेशंटच्या जिवाची पर्वा नसते. त्यांना आपल्यावर मालप्रॅक्टिसची केस होईल ही भीती नसते ना! त्यांना अक्षरशः त्यांच्या मेंबरचा खून करायला मोकळीक असते. मी परत तुझ्या एच्.एम्.ओ.ला फोन करतो. तू पण मि. पोस्टपोनला भेटायचा प्रयत्न कर."

मी विचारले, "पोस्टपोनने मला भेटायला नकार दिला तर, मी काय करू?"

डॉक्टर म्हणाले, "तुझा जीव तुला प्यारा असला तर स्वतःच ऑपरेशनचे पैसे दे. तुला तुझ्या गावातल्या हॉस्पिटलमध्ये ऑपरेशन महाग पडत असेल तर हर्निया सर्जरीचा सेल असलेल्या हॉस्पिटलमध्ये जा. सेलवाल्या हॉस्पिटल्सची यादी तुला www.surg.hot sale@.comवर मिळेल."

"डॉक्टर, मी एक अगदी गरीब, लोनच्या ओझ्याने हताश झालेला विद्यार्थी आहे."

"मग तू असेंब्ली लाईन सर्जरीवाल्या हॉस्पिटलात जा."

"म्हणजे?"

"असेंब्ली लाईन सर्जरीत अनेक ऑपरेशन टेबल्स गोल गोल फिरत असतात. प्रत्येक टेबलाजवळ उभा असलेला टेक्निशियन त्याचे विशिष्ट काम करतो."

"विशिष्ट काम म्हणजे काय?"

"एक पोटाची चामडी कापतो, दुसरा आतडी कापतो, तिसरा ती शिवतो व चवथा ती परत पोटात खुपसतो.... इ.इ. अखेरीस जखमेला टाके घालून व बँडेज लावून शेवटच्या टेबलावरून पेशंट पार्किंग लॉटमध्ये ढकलला जातो. तिथे शुद्धीवर येईपर्यंत एका झोळीत पडून राहतो."

"कुणाचे काही चुकले तर?"

"तर एक सर्जन बाजूला सज्ज असतो. तो ऑपरेशन पूर्ण करतो."

"मला हॉस्पिटलमध्ये ॲडमिट व्हावे लागले तर?"

"ते क्वचितच कुणाला ॲडमिट करतात. पण कदाचित पेशण्टला ॲडमिट करावा लागेल ह्या धोक्यामुळे ते आधीच सगळ्या पेशंट्सकडून ॲडमिशनचे पैसे घेतात.सहा महिने स्वतः व्याज खातात व मग पेशंटचे पैसे पेशंटला परत देतात."

"डॉक्टर, मी अगदी गरीब माणूस आहे. दुसरा काही मार्ग आहे का?"

"तू परदेशात जा. तिथे उत्तम डॉक्टर आहेत. मेक्सिकोत आपल्या पेशंट्ससाठी अनेक नवी हॉस्पिटले उघडली आहेत. ह्या हॉस्पिटलांमुळे आपली करन्सी देशाबाहेर जातेय. ट्रेड डेफिसिट वाढत चालले आहे. पण सरकार इन्शुअरन्स कंपन्यांच्या मुठीत आहे. कँपेनला पैसे देतात ना."

मी हताश होऊन म्हणालो, "माझ्या खिशात पैसाही नाही. मला ऑपरेशन स्वर्गातच स्वर्गीय डॉक्टरांकडून करून घ्यावे लागेल."

"डॉक्टर म्हणाले, "गुड लक."

दुसऱ्या दिवशी मिस डिलीडॅलीचा फोन आला, "तुझा डॉक्टर फारच कटकट करतोय. मि. पोस्टपोनने तुला दोन आठवड्यात अपॉइंटमेंट दिलीय."

मी म्हणालो, "जगलो वाचलो तर भेटू."

"तुला काही होणार नाही. तुझा आवाज ऐकून मला ते समजतेय."

दोन आठवड्यांनी मला पाहून मिस डिलीडॅलीची निराशा झालेली दिसली. ती म्हणाली, "म्हणजे तू अजून जिवंत आहेस तर!"

मि. पोस्टपोन म्हणाला, "तुझे डायग्नॉसिस मला ठाऊक आहे. शंभर टक्के कोपेमेंट देऊन तू कुठल्याही हॉस्पिटलमध्ये जाऊ शकतोस. हर्नियाचा सेल लागेपर्यंत थांबलास तर कोपेमेंट दहा टक्के कमी होईल. ७५ टक्के कोपेमेंटला तुला आम्ही असेम्ब्ली लाईन सर्जरीला पाठवू."

"मी पॉलिसी विकत घेतली तेव्हा मला तुमच्या दलालाने, 'एच्.एम्.ओ.सर्जरीसाठी पूर्ण खर्च करतात' असे सांगितले होते."

"ते खरे आहे.पण आम्ही सर्जरी कुठे व केव्हा होईल हे सांगितले नव्हते. तू फाईन प्रिंट वाचलेस का?"

"माझ्याकडे दमडी पण नाही. मी कोपेमेंट देऊ शकत नाही."

मि. पोस्टपोनने भिंतीवरच्या नकाशातल्या एका टिंबाकडे बोट दाखवले. "हे सर्जिलँड. इथे तुझे ऑपरेशन फुकट होईल."

मी म्हटले,"ह्या देशाबद्दल मी कधी काही ऐकले नाही."

"ते आफ्रिकेतले एक बेट आहे. तिथे मनुष्यवस्ती नाही. तिथे जायला विमानाने एक दिवस लागतो. तिथे लेबर चीप आहे म्हणून आम्ही एक हॉस्पिटल उघडले आहे."

"तिथे जायला तिकिटाची किंमत किती आहे?"

"१००० डॉलर्स."

मी जायला उठलो. "मी चालल्लो. गुड बाय!"

"मग तू काय ठरवले आहेस?"

"यापुढे इन्शुअरन्स कॅन्सल."

"मग ऑपरेशनचे काय?"

"आपले पूर्वज सर्जरीशिवाय जगले. मी पण तसाच जगणार."

मि. पोस्टपोन आनंदाने म्हणाला, "आमचे सर्व पेशन्ट्स तुझ्यासारखा विचार करू दागले तर आमचे प्रॉफिट मार्जिन १०० टक्के होईल."

मी ऑफिसातून बाहेर पडताना मला त्याची आनंदी पुटपुट ऐकायला आली. "एच्.एम्.ओ. झिंदाबाद."

मी वळून जोरात ओरडलो, "आणि पेशण्ट्स मुर्दाबाद."